जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १०४५ दिनांक ०२/०७/२०२०**

## लष्कर पोलीस ठाणे,पुणे शहर

## वाहन चोरास केले अटक

दि.२६/०६/२०२० रोजी १७.०० वा.तपास पथकातील पो.हवा ३१२५ शितोळे, पो.शि. ८९२९ शिंगे, पो.शि. १२००५ शिरगीरे हे पायी पेट्रोलिंग करीत असताना अशोक चक्र मंडळा जवळ, डवायर लेन कॅम्प, पुणे येथे आले असता जोरजोराने चोर चोर असा आवाज ऐकु आल्याने तेथे पाहणी करता एक इसम गाडी चोरी करुन घेऊन जात होता. व त्याच्या पाठीमागे काही इसम पाठलाग करत चोर चोर असे ओरडत होते. तेव्हा पोलीस स्टाफ व तेथील लोकांनी सदर इसमास ताब्यात घेतले.त्या इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव मोसीन समीर सय्यद, वय-१९ वर्षे, रा.घर नं २२ पपया चाळ, कैलास कदम यांच्या ऑफीसच्या पाठीमागे, अनिल मंगल कार्यालया जवळ, खराळवाडी, पिंपरी पुणे असे सांगीतले. तेव्हा त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचे कडुन फिर्यादीची ८०,०००/- रुपये किंमती ची एक बजाज प्लसर गाडी जप्त करण्यात आली आहे.

तसेच वर नमुद अटक आरोपीस विश्वासात घेऊन तपास केला असता त्याने पिंपरी पोलीस ठाणे, गुरन ४०३/२०२० भादवि कलम ३७९ मध्ये चोरीस गेलेली ३०,०००/- रुपये किं. एक होंडा ॲक्टीव्हा ही चोरी केल्याचे सांगीतल्याने सदरची होंडा ॲक्टीव्हा गाडी निवेदन पंचनाम्याने जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी ही श्री शिरीष सरदेशपांडे, मा.पोलीस उप आयुक्त सो, परि.२, पुणे शहर, श्री चंद्रकांत सांगळे सो,मा.सहा.पोलीस आयुक्त सो, लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शना खाली तसेच श्री चंद्रकांत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सो यांचे नेतृत्वाखाली तपास पथकाचे अधिकारी एम.व्ही.राऊत, सपोनि पी.आर. डोंगळे, पोउनि व तपास पथकातील पो.हवा ५८२६ थिकोळे, पो.हवा ३१२५ शितोळे, पो.शि.९८१५ भोसले, पो.शि. ८९२९ शिंगे, पो. शि.९८२९ धावडे, पो.शि.८८०५ पठाण, पो.शि. ७३३० राऊत, पो.शि. ९८१८ हुवाळे, पो.शि. ७८७७ मांजरे, पो.शि ८९९८ कांबळे, पो.शि.१२००५ शिरगीरे यांनी केलेली आहे.